# आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई अंतर्गत

# शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती

**e-mail ID : gacbaramati@gmail.com**

# नागरिकांची सनद२०२५

# नागरिकांची सनद २०२५

प्रस्तावना :-

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई आणि आयुष संचालनालय, मुंबई अंतर्गत शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, बारामती ही संस्था स्थापन करण्यास सन २० जुलै २०२१ मध्ये शासनाची मान्यता मिळाली. त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासुन या महाविद्यालयात NCISM च्या मान्यतेने आयुर्वेद पदवी (BAMS आयुर्वेदाचार्य) हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे.

भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग (NCISM), आयुष मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडुन या महाविद्यालयास १०० पदवी विद्यार्थी प्रवेश क्षमतेस मान्यता प्रदान करण्यात आली असून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (MUHS), नाशिक संलग्नित आयुर्वेद अभ्यासक्रम येथे चालविला जातो. या महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रमानुसार खालीलप्रमाणे एकूण १४ विभागांतर्गत अध्यापन केले जाते.

१)संस्कृत संहिता विभाग. २)शरिररचना विभाग. ३)शरिरक्रिया विभाग.

४)द्रव्यगुण विभाग. ५)रसशास्त्र विभाग. ६)रोगनिदान विभाग.

७)स्वस्थवृत्त विभाग. ८)अगदतंत्र विभाग. ९)शल्यतंत्र विभाग.

१०)शालाक्यतंत्र विभाग. ११)स्त्रीरोग व प्रसुतितंत्र विभाग. १२)कौमारभृत्य विभाग.

१३)कायचिकित्सा विभाग. १४)पंचकर्म विभाग.

विभागास आवश्यक सुसज्ज प्रयोगशाळा, संग्रहालय, ग्रंथालय, वन औषधी उद्यान तसेच महाविद्यालयाच्या आवारात मुलांचे व मुलींचे स्वतंत्र वसतिगृह उपलब्ध आहे.

महाविद्यालयामध्ये प्रथम वर्ष बी.ए.एम.एस. १०० विद्यार्थी शैक्षणिक वर्षे २०२२-२०२३ मध्ये प्रवेशित झालेले आहेत, शैक्षणिक वर्षे २०२३-२०२४ मध्ये दुसरी बॅच प्रवेशित झाली आहे व शैक्षणिक वर्षे २०२४-२५ मध्ये तिसरी बॅचदेखील प्रवेशित झाली आहे.

सन २०२४-२५ पदवी अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात येणाऱ्या शुल्काचा तक्ता

| | |
|---|---|
| सत्र शुल्क | रु.५२,२००/- |
| विकास निधी | रु.३०००/- |
| जिमखाना शुल्क | रु.५००/- |
| ग्रंथालय शुल्क | रु.१०००/- |
| विद्यार्थी संसद शुल्क | रु.१७२/- |
| ग्रंथालय अनामत रक्कम | रु.२०००/- |

(टिपः- शासन नियमानुसार पदवी अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक शुल्कात दरवर्षी प्रचलित नियमानुसार १० टक्के वाढ करण्यात येते.)

मौजे मेडद, बारामती येथील प्रकल्पांतर्गत ३० एकर जागेमध्ये नवीन प्रशस्त शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयासाठी नवीन इमारतीचे बांधकाम चालू आहे. NCISM व MUHS च्या मानकाप्रमाणे या ठिकाणी सर्व विभागांकरिता आधुनिक सोयीसुविधांनी युक्त असे विस्तृत विभाग, वैद्यकीय प्रयोगशाळा व संग्रहालय इत्यादींचे अद्ययावतीकरण करण्यात येत आहेत. येथिल सुसज्ज ग्रंथालयात संदर्भ ग्रंथ, संहिता, दुर्मिळ पुस्तके यांचा संग्रह असून अद्ययावत ज्ञानप्राप्तीसाठी डिजीटल लायब्ररीचीदेखील सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. आयुर्वेदामध्ये वर्णन केलेल्या विविध औषधी वनस्पतींची प्रत्यक्ष ओळख व्हावी, तसेच त्यांचे औषधी उपयोग विद्यार्थ्यांना अवगत व्हावेत यासाठी महाविद्यालयाच्या परिसरात विस्तीर्ण औषधी उद्यान विकसित करण्याचे काम प्रगती पथावर आहे. रुग्णालयात येणारे रुग्ण, त्यांचे नातेवाईक तसेच जनसामान्यांना देखील येथे लागवड केलेल्या वनस्पतींची माहिती उपलब्ध असणार आहे.

विद्यार्थी आणि विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र अशी प्रशस्त व हवेशीर वसतिगृहे उभारण्यात आलेली आहेत. अध्यापक, अधिकारी व कर्मचारी यांच्या निवासाची सोय देखील महाविद्यालय आवारात करण्याचे काम प्रगती पथावर आहे. जेणेकरुन संलग्नित रुग्णालयांतर्गत वैद्यकीय सेवा अविरतपणे जनसामान्यांपर्यंत पोहचविता येतील.

संलग्नित शासकीय संस्था-

शासकीय आयुर्वेद महाविद्याल, बारामती या संस्थेशी संलग्नित बाह्यरुग्ण विभाग व १०० रुग्णशय्या क्षमता असलेले आंतर रुग्ण विभाग असलेले रुग्णालय सद्य:स्थितीत महिला रुग्णालय, बारामती, आवारात सुरु आहे.

संस्थेचा उद्‌देश -

या संस्थेचा प्रमुख उद्‌देश हा आयुर्वेदाचा प्रचार व प्रसार वाढविणे, जनतेमध्ये आयुर्वेदाविषयी जनजागृती निर्माण करणे, विद्यार्थ्यांसाठी अत्यंत माफक शुल्कामध्ये आयुर्वेद पदवी अभ्यासक्रम उपलब्ध करुन देणे, रुग्णांना चिकित्सा उपलब्ध करुन देणे हा आहे.

या महाविद्यालयातंर्गत खालील कार्यालयप्रमुख/अधिकाऱ्यांकडून त्यांच्याशी संबंधित माहिती उपलब्ध करुन घेता येईल-

| अ.क्रं. | माहिती विषय | पदनाम | पत्ता | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| ०१ | शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती, पुणे. | अधिष्ठाता | बारामती- ४१३११५. | ९८२२९६१४९४ |
| | | प्रशासकीय अधिकारी | बारामती- ४१३११५. | ९८२३६६८७०४ |

प्रशासकीय विभाग -

या संस्थेचे प्रशासन हे प्रशासकीय कार्यालयामार्फत खालील विभागांकडुन केले जाते.

१) विद्यार्थी विभागः

| अ. क्र. | विभागाकडुन पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल. | सेवा पुरवणारा अधिकारी/कर्मचारी | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्यांचा दुरध्वनी क्रमांक. |
|---|---|---|---|---|
| ०१ | ➢ विद्यापिठास संलग्निकरणाबाबतचे प्रस्ताव पाठविणे<br>➢ प्रवेश प्रक्रिया राबविणे<br>➢ विद्यार्थ्यांच्या प्रवेश पात्र-अपात्रबाबतचे प्रस्ताव विद्यापिठास पाठविणे<br>➢ विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाबाबतचे परिक्षा फार्मस विद्यापिठास पाठविणे<br>➢ विद्यार्थ्यांच्या निगडीत इतर सर्व कामे करणे. | विद्यार्थ्याचे संबधित प्रवेश पात्र-अपात्र,परिक्षा अर्ज विद्यापीठाकडे विहित वेळेत सादर करण्यांत येतात. | अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती, प्रशासकीय अधिकारी, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती तसेच तत्सम विभागातील विभाग प्रमुख | अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती. दुरध्वनी क्रमांक ९८२२९६१४९४ |

२) आस्थापना विभागः

| अ. क्र. | विभागाकडुन पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविण्यात येते | सेवा पुरवणारा अधिकारी/कर्मचारी | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्यांचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| ०१ | ➢ महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीपासुन ते सेवानिवृत्तीपर्यंतच्या सेवा अभिलेखा संदर्भातील सर्व कामे पार पाडणे. | शासनाने विहित केलेल्या कालावधीत सेवा पुरविण्यात येते. | अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती तसेच तत्सम विभागातील कर्मचारी | अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती दुरध्वनी क्रमांक ९८२२९६१४९४ |

३) लेखा विभागः

| अ. क्र. | विभागाकडुन पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरवणारा अधिकारी/कर्मचारी | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्याच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| ०१ | ➢ महाविद्यालयातील बांधकामाबाबतचे तसेच यंत्र व साधनसामग्रीबाबतचे प्रस्ताव तयार करुन आयुष संचालनालय कार्यालयास सादर करणे.<br>➢ अधिकारी व कर्मचारी यांचे घरबांधणी, संगणक, मोटारसायकल, मोटारकार अग्रिमाबाबतचे प्रस्ताव आयुष संचालनालय, मुंबई कार्यालयास पाठविणे<br>➢ महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतन देयके, प्रवास भत्ता देयके कोषागारास सादर करणे.<br>➢ विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनाची देयके कोषागरास सादर करणे. | शासनाने विहित केलेल्या कालावधीत सेवा पुरविण्यात येते . | अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती, प्रशासकीय अधिकारी, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती तसेच तत्सम विभागातील विभाग प्रमुख | अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती दुरध्वनी क्रमांक ९८२२९६१४९४ |

४) रोखपाल विभागः

| अ. क्र. | विभागाकडुन पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरवणारा अधिकारी/कर्मचारी | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्याच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| ०१ | ➢ महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतन देयके, प्रवास भत्ता देयके व इतर देयकांची अदायगी करणे.<br>➢ विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनाची देयकांची अदायगी करणे. | शासनाने विहित केलेल्या कालावधीत सेवा पुरविली जाईल. | प्रशासकीय अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती | अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती दुरध्वनी क्रमांक ९८२२९६१४९४ |

कलम ४(१)(**b**)(**ii**) नमुना (ब)

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या कर्तव्यांचा तपशिलः

| अनु. क्रं | पदनाम | कर्तव्ये |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय अधिकारी | १) अधिष्ठाता यांच्या कर्तव्य व जबाबदा-या सक्षमपणे पार पाडण्यास सर्वतोपरी मदत करणे.<br>२) आस्थापनाविषयक प्रमुख व दैनंदिन बाबी पाहणे.<br>३) महाविद्यालयातील अधिक्षक,प्रमुख लिपीक,वरिष्ठ लिपीक,लिपीक-टंकलेखक यानां वेळोवेळी मार्गदर्शन करणे<br>४) महाविद्यालयातील वर्ग-४ कर्मचा-यांवर त्यांचे काम व वर्तणूक यांचेवर संपुर्ण नियंत्रण ठेवणे.<br>५) अधिष्ठाता यांनी वेळोवेळी दिलेली कामे,वरीष्ठ कार्यालयाशी संबंधीत कामे तत्परतेने व जबाबदारीने पार पाडणे. |
| २ | कार्यालय अधिक्षक | ६) कार्यासनाशी संबधित अधिका-यांची आस्थापना, आस्थापना विभाग (वर्ग-१,वर्ग-२,वर्ग-३,वर्ग-४), लेखा विभाग, विद्यार्थी विभाग व आवक-जावक विभाग इत्यादी सर्व विभागातील प्रकरणांचा योग्य पध्दतीने नियमानुसार व वेगाने निपटारा करणे.<br>७) कार्यसनाशी संबंधित सर्व कर्मचा-यांना मार्गदर्शन करणे,नवीन कामाची संबंधितास माहिती करुन देणे व त्याचेवर नियंत्रण ठेऊन त्यांना संघभावनेने व कार्यक्षमतेने काम करण्यात मदत करणे.<br>८) कार्यसनाशी संबंधित प्रकरणांचा जलदगतीने निपटारा होण्याच्या दृष्टीने सोप्या पध्दती शोधणे.कार्यासनातील कर्मचा-यांनाही त्यांच्या संकल्पना समोर ठेवण्यास प्रोत्साहन देणे व अशा प्रकारे केलेल्या कामाचे श्रेय संबंधीत कर्मचा-यांना देणे.<br>९) कार्यसनाशी संबंधित कर्मचा-यांची रजा मंजूर करण्याची शिफारस करणे. कार्यसनाशी संबंधित कर्मचा-यावर त्यांचे काम,वर्तणुक व रजा ठतयादी बाबीवर शिस्तबध्द नियंत्रण ठेवणे.<br>१०) अधिष्ठाता यांनी वेळोवेळी दिलेली कामे,वरीष्ठ कार्यालयाशी संबंधीत कामे तत्परतेने व जबाबदारीने पार पाडणे. |
| ३ | प्रमुख लिपीक/ वरिष्ठ लिपीक | ११) विभागाशी संबंधीत प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करणे<br>१२) विभागातील नेमून दिलेली कामे तत्परतेने पार पाडणे.<br>१३) कार्यसनाशी संबधित अधिक्षकांनी नेमुण दिलेली कामे तत्परतेने पार पाडणे.<br>१४) कामकाजात कोणत्याही प्रकारची अडचण/शंका उद्भवल्यास कार्यालय अधिक्षक/प्रशासकीय अधिकारी यांचे मार्गदर्शनाने अडचणी/शंकाचे निरसण करुन घेणे.<br>१५) अधिष्ठाता यांनी वेळोवेळी दिलेली कामे,वरीष्ठ कार्यालयाशी संबंधीत कामे तत्परतेने व जबाबदारीने पार पाडणे. |
| ४ | लिपीक-टंकलेखक | १६) अधिष्ठाता,प्रशासन अधिकारी,कार्यालयीन अधिक्षक,प्रमुख लिपीक व वरिष्ठ लिपीक यांनी वेळोवेळी दिलेली टंकलेखानाचे तसेच टंकलेखना व्यतिरिक्त कामे तत्परतेने पार पाडणे.<br>१७) कामकाजात कोणत्याही प्रकारची अडचण/शंका उद्भवल्यास कार्यालय अधिक्षक/प्रशासकीय अधिकारी यांचे मार्गदर्शनाने अडचणी/शंकाचे निरसण करुन घेणे.<br>१८) अधिष्ठाता यांनी वेळोवेळी दिलेली कामे,वरीष्ठ कार्यालयाशी संबंधीत कामे तत्परतेने व जबाबदारीने पार पाडणे. |

---///---

# रुग्णालयाविषयी माहिती

आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या संचालनालयांतर्गत नव्याने सुरु झालेल्या शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामतीशी संलग्नित रुग्णालयामध्ये खालीलप्रमाणे सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात.

रुग्णालयातील कायाचिकित्सा, पंचकर्म, शल्यतंत्र, शालाक्यतंत्र, स्त्रीरोग व प्रसुतीतंत्र, बालरोग व स्वस्थवृत्त व विष चिकित्सा विभागा अंतर्गत बाह्यरुग्ण व आंतररुग्ण सेवा देण्यात येते. सकाळी ०९.०० ते ०१.०० व दुपारी ०३.०० ते ०५.०० या वेळेत उपरोक्त सर्व विभागांच्या बाह्यरुग्ण विभागाची सेवा सुरु आहे. पंचकर्म विभागांतर्गत सर्व पंचकर्म सुविधा उपलब्ध आहेत. स्त्रीरोग व प्रसुतीतंत्र विभागामध्ये गर्भिणी परिचर्या, गर्भसंस्कार व स्त्रीरोग विषयक विविध आजार व उपचार इ. विषयी मार्गदर्शन केले जाते. बालरोग विभागामध्ये स्वर्णप्राशन संस्कार केले जातात. तसेच स्वस्थवृत्त विभागामध्ये योग व दिनचर्या आणि आहार या विषयी मार्गदर्शन करण्यात येते. तसेच योग प्रात्यक्षिके घेतले जातात व रग्णांना आवश्यकतेनुसार पथ्यापथ्याचा सल्ला दिला जातो.

कायचिकीत्सा विभागामार्फत रुग्णालयामध्ये वातव्याधी, मणक्याचे आजार, पोटाचे आजार, पक्षाघात, त्वचारोग, कावीळ, हृदयरोग, मधुमेह, कफाचे आजार, आम्लपित्त, दमा, जुनाट सर्दी, लठ्ठपणा इ. आजारांवर उपचार केले जातात.

Geriatric OPD (वार्धक्यजन्य बाह्यरुग्ण विभाग) - समाजातील ज्येष्ठ नागरिकांकरिता प्राधान्य क्रमाने रुग्णसेवा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

पंचकर्म विभागामध्ये वमन, विरेचन, बस्ती, नस्य, रक्तमोक्षण, स्नेहन, स्वेदन, शिरोधारा, कटीबस्ती, मन्याबस्ती, जानुबस्ती, पिंडस्वेद, अवगाहस्वेद, अग्निकर्म, पत्रपोट्टली स्वेद इ. उपक्रम केले जातात.

---///---